**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# दु:खितांच्या जीवनात आनंदी क्षण निर्माण करा

## पाटण येथील व्याख्यानात मोहन पालेशा यांचे प्रतिपादन



पाटण : व्याख्यानात बोलताना मोहन पालेशा. समवेत अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण, गजानन माने, सौ. विद्या पाटील, प्रा. शिरीष पवार.

वार्ताहर
पाटण

हा जन्म पुन्हा नाही. आपल्या अवतीभवती दु:खित जीवन जगणाऱ्यांच्या जीवनात स्नेह, प्रेम, जिव्हाळ्यातून आपल्याला आनंदी क्षण निर्माण करता आले तर यासारखा जीवनात दुसरा आनंद नाही, असे प्रतिपादन पुणे येथील प्रसिद्ध वक्ते मोहन पालेशा यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. अब्दुल कलाम सभागृहात आयोजित केलेल्या 'जिंदगी ना मिलेगी दुबारा' याविषयावर आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, गजानन माने, रोटरी क्लबच्या अध्यक्षा रो. विद्या पाटील, कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोहन पालेशा म्हणाले, पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. त्यातून आपण विभक्त कुटुंब पद्धती स्वीकारली. एक मुलगा आणि एक मुलगी अशी फॅमिली झाली. त्या मुलांना आजी, आजोबा नाहीत, मामा, मावशी, काका, चुलते नाहीत. शेजाऱ्यापाजाऱ्यांशी तसेच इतर कोणाशी देणंघेणं नाही. कोणाच्या सुख दु:खातही सहभागी नाही आणि आई वडीलही सोबत रहात नाहीत.पुण्यासारख्या शहरामध्ये जेव्हा प्रथम वृद्धाश्रम आले, त्यावेळी आपल्या सामाजिक चौकटीमध्ये या वृद्धाश्रमाची काय आवश्यकता आहे, असा सगळ्या लोकांना प्रश्न पडला होता. पण वृद्धाश्रम आले आणि आपल्या याच समाजामध्ये स्थिरावले.

सामाजिक रचनेमध्ये धोक्याची घंटा वाजत असताना आपल्यातलं थोडंसं सुख इतरांना देण्याचा प्रयत्न केला तर आपण जास्त सुखी, आनंदी होऊ शकतो. मंदिरात जाणे आणि पूजापाठ करणे म्हणजे अध्यात्म नाही. आपला चांगला श्रद्धाभाव आणि मनोमन आपलं आपण स्वत:च स्वत:चं अध्ययन करणं म्हणजे अध्यात्म आहे.

अमरसिंह पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विनायक राऊत व प्रा. डॉ. श्रीनिवास पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य शिरीष पवार यांनी आभार मानले.